## <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>

### <u>विशेष मा. महापालिका सभा</u>
### <u>कार्यपत्रिका क्रमांक – ३१</u>
### <u>सभावृत्तांत</u>

<u>दिनांक – १५.६.२०१९</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची ची विशेष मा. महापालिका सभा शनिवार दिनांक १५.६.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ६) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ७) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ८) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ९) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १०) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ११) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १२) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १३) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |
| १४) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |

,

१५) मा.गोफणे अनुराधा देविदास

१६) मा.बारसे प्रियांका प्रविण

१७) मा.अजित दामोदर गव्हाणे

१८) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१९) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२०) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२१) मा.फुगे भिमाबाई पोपट

२२) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४) मा.लांडे विक्रांत विलास

२५) मा.गीता सुशिल मंचरकर

२६) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२७) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२८) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२९) मा.अनुराधा गणपत गोरखे

३०) मा.मंगला अशोक कदम

३१) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३२) मा.अश्विनी भिमा बोबडे

३३) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३४) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३५) मा.भालेकर प्रविण महादेव

३६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३९) मा.घोलप कमल अनिल

,

४०) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४१) मा.चिखले सचिन तुकाराम

४२) मा.यादव मीनल विशाल

४३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४४) मा.शैलजा अविनाश मोरे

४५) मा.बाबर शर्मिला राजू

४६) मा.अमित राजेंद्र गावडे

४७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५०) मा.ढाके नामदेव जनार्दन

५१) मा.करुणा शेखर चिंचवडे

५२) मा.अपर्णा निलेश डोके

५३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५४) मा.कोमल दिपक मेवानी

५५) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५६) मा.सुलक्षणा राजू धर

५७) मा.सुजाता सुनिल पालांडे

५८) मा.कदम निकीता अर्जुन

५९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६०) मा.काळे उषा दिलीप

६१) मा.पवार मनिषा प्रमोद

६२) मा.बारणे अर्चना तानाजी

६३) मा.अभिषेक गोविंद बारणे

६४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

,

६५) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६६) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६७) मा.बारणे माया संतोष

६८) मा.दर्शले रेखा राजेश

६९) मा.कलाटे राहुल तानाजी

७०) मा.ममता विनायक गायकवाड

७१) मा.कामठे तुषार गजानन

७२) मा.चोंधे आरती सुरेश

७३) मा.कस्पटे संदिप अरुण

७४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७६) मा.सुनिता हेमंत तापकीर

७७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७९) मा.कुटे निर्मला संजय

८०) मा.आंगोळकर सागर सुनिल

८१) मा.मुंढे उषा अंकुश

८२) मा.लोखंडे चंदा राजू

८३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

८७) मा.संतोष बबन कांबळे

८८) मा.सोनवणे शारदा हिरेन

८९) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

,

९०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९२) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, , मा.निकम- सह शहर अभियंता, मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.दुरगूडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट - प्र.सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य औ.प्र.केंद्र, मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.सावळे –अ. आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता (वायसीएमएच), मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.पाटील, मा.घुबे, मा.पोरेड्डी, मा.वाघुंडे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे- पशुवैदयकीय अधिकारी, मा.गोफणे- आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नगरसचिव -** विषय क्र.१ –_पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २०११८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक " अ " व "क " तसेच केंद्रशासन पुरस्कृत योजनांसह महानगरपालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे अंदाजपत्रक " प " विचारासाठी.

**मा.नगरसचिव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.महापौर यांनी विहीत केल्याप्रमाणे विशेष सभेतील कामकाजाचा क्रम पुढीलप्रमाणे असेल-

**१)** अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" संबंधिचे मा.सभापती, स्थायी समिती यांचे

,

निवेदन,

२) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावर चर्चा,

३) चर्चा समाप्तीनंतर अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच "प" यावरील ठराव मांडणे - अनुमोदन देणे,

४) अंदाजपत्रकावरील ठरावास सुधारणा/फेरबदलच्या सूचना मांडल्या गेल्यास त्यांची वैधता- ग्राह्य-अग्राह्यता तपासण्याकरीता किमान पूर्ण २ दिवस सभा कामकाज तहकूब करणे -

५) एका सदस्यास एकच सुधारणा/फेरबदल सूचना मांडता येईल किंवा त्यांस अनुमोदन देता येईल. मांडण्यात येणारी सूचना कितीही मोठी असू शकेल.

६) अंदाजपत्रकातील खर्चाची तरतूद वाढवावयाची असेल किंवा नवीन तरतूद करावयाची असेल तर कोणत्या खर्चाची तरतूद तेवढ्या प्रमाणात कमी करावयाची किंवा कोणत्या जमेत वाढवावयाची हे फेरबदलाची सूचना ग्राह्य होण्यासाठी नमूद असणे आवश्यक राहील.

मा.सभापती स्थायी समिती यांना विनंती करतो की त्यांनी अंदाजपत्रका वरील निवेदन/मनोगत व्यक्त करावे.

------------

**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ चा सुधारीत व सन २०१९-२० चा मुळ अंदाजपत्रकाचे याठिकाणी निवेदन सादर करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ३५ वे अंदाजपत्रक याठिकाणी सादर होत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ सुधारित सन २०१९-२० चा मुळ अर्थसंकल्प अ, प व क तसेच जमा खर्च व केंद्रशासनाच्या पुरस्कृत योजनांसह अंदाज स्थायी समितीच्या वतीने मा.महापालिका सभेपुढे सादर करण्यास आम्हाला अतिशय आनंद होत आहे. २०१८-१९ या आर्थिक वर्षात र.रु. ४,०३३ कोटी शिल्लकेसह इतकी रक्कम जमा होईल हे अपेक्षित धरुन अंदाजपत्रक मा.स्थायी समिती मार्फत महापालिका सभेपुढे सादर केले होते. सन २०१९-२० च्या आर्थिक वर्षात र.रु. ४६२० कोटी आरंभिच्या शिल्लकेसह उत्पन्न अपेक्षीत आहे व त्यात प्रत्यक्षात खर्च र.रु.४५९० कोटी होईल व मार्च २०२० अखेर र.रु. ३० कोटी इतकी शिल्लक राहील. सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामधले काही वैशिष्टेय याठिकाणी सांगू इच्छितो. भक्ती शक्ती चौक

,

येथे ग्रेड सेपरेटर व उड्डाण पुल बांधणेसाठी ३५.५२ कोटीची तरतूद केलेली आहे. बोपखेल आळंदी ६० मी. रुंद रस्त्याच्या ४ पॅकेजसाठी २.५ कोटीची तरतूद केलेली आहे. या वर्षी विशेष करुन साबरमतीच्या धरतीवरती नदी सुधार प्रकल्प आपल्या महानगरपालिकेच्या वतीने आपण करत आहोत. त्या नदी सुधार प्रकल्पासाठी र.रु. २०० कोटीचे कर्जरोखे उभारणे अशा संदर्भातल याठिकाणी घेतलेलं आहे. मेट्रो प्रकल्पासाठी ५ कोटीची तरतूद या अंदाजपत्रकामध्ये आहे. आंद्रा भामा आसखेड योजनेसाठी र.रु. २८ कोटीची तरतूद याठिकाणी आहे. रावेत बंधारा सक्षमीकरणासाठी र.रु. ५ कोटी ७५ लाख ची तरतूद आहे. बीआरटीसाठी पर्यावरणपुर्वक ग्रीन बससाठी र.रु. ९० कोटीची तरतूद केलेली आहे. भक्ती शक्ती चौक ते मुकाई चौक किंवळे या रस्त्यासाठी र.रु. १० कोटीची तरतूद याठिकाणी ठेवलेली आहे. कोकणे चौक ते काळेवाडी फाटा चौकापर्यंत एचसीएमटीआर विकसीत करणेसाठी र.रु. ७ कोटीची तरतूद केलेली आहे. आकुर्डी रेल्वेस्टेशन पासून गंगानगर पिं.चि. अभियांत्रिकी महाविदयालय तसेच रावेत येथील बास्केट ब्रिज व गुरुद्वारा चौकापर्यंतचे ४ रस्ते पादचारी पध्दतीने अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणेसाठी रु.रु. ३० कोटी तरतूद याठिकाणी केलेली आहे. पुणे नाशिक महामार्गावरील पांझरपोळ चौक ते च-होली लोहगाव मनपा हद्दीपर्यंतचा विकास आराखडयातील रस्ता विकसीत करण्यसाठी या अर्थसंकल्पामध्ये र.रु. ५२.६३ कोटीची तरतूद केलेली आहे. जागतिक दर्जाचे एकत्रित प्रवेशयोग्य आणि सुरक्षित शहर बनवण्यासाठी काही याठिकाणी ठळक बाबी मांडलेल्या आहेत. पुणे मेट्रो अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यालयापासून निगडीपर्यंत मेट्रोचा विस्तार करणे. निगडी भक्ती-शक्ती ते मुकाई चौक असा बीआरटी मार्ग तयार करणे. आळंदी पुणे मार्गावरील बीआरटी मार्ग तयार करणे. एचसीएमटीआरचा एकात्मिक पध्दतीने विकास करणे. विवीध ठिकाणी उड्डाणपुल अथवा समतल विलगक बांधणे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सुरक्षित आणि रुंद असे पदपथ आणि सायकल ट्रॅक निर्माण करुन मोटर विरहीत दळणवळण सुविधा उपलब्ध करुन देणे. नियोजन आराखडयातील नविन समावेश झालेल्या गावांमधील नियोजित रस्त्यांचा विकास करणे. निरोगी हरित व पर्यावरणपुरक शहर करण्यासाठी काही ठळक वैशिष्ठय याठिकाणी आहेत- आंद्रा आणि भामा आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठी पुरेशी तरतूद करुन चिखली येथे जलशुध्दीकरण प्रकल्प उभारणे. यासंदर्भात निवीदा प्रक्रीया याठिकाणी उघडलेली आहे ते या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ठ आहे. पवना बंद पाईपलाईन योजना लवकरात लवकर कार्यान्वित करणे. ती अनेक वर्षापासून याठिकाणी प्रलंबीत आहे त्या संदर्भातला याठिकाणी आंतर्भाव

,

केलेला आहे. २४X७ पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्थेची योजना या वर्षी पुर्ण करणेसाठी अर्थसंकल्पामध्ये समावेश आहे. मलनिस्सारण नलिकांची पुर्नस्थापना करणे. एलईडी दिवाबत्तीची सोय करणे. मनपा मालकीच्या व शासकीय इमारतीच्या छतावर सौरउर्जा प्रकल्प राबविणे. रावेत बंधा-याचे सक्षमीकरण करणे. घराघरातून कच-याचे वहन करुन कच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने विघटन करुन सुमारे १२ मेगावॅट विज निर्मिती करणे, या वर्षी या कामासाठी विशेष तरतूद केलेली आहे. मागच्या वर्षी त्या संदर्भातील वर्कऑर्डर दिली गेलेली आहे. मोशी येथील डम्पींग यार्डवरील पुर्वापार पडलेल्या कच-यावर प्रक्रिया करुन सॅनिटरी लॅण्डफिल तयार करणे. यशवंतराव चव्हाण रुग्णालयात पदव्युत्तर पदवी संस्था स्थापन करुन तज्ञ वैदयकीय अधिका-यांची सातत्यापुर्ण उपलब्धता वाढवणे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला आपल्या या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएमएचच्या माध्यमातून परवानगी मिळालेला आहे, देशातील प्रथम पदवीप्रदान संस्था ही याठिकाणी केलेली आहे. विशेष करुन याठिकाणी आयुक्त आणि सर्व प्रशासकीय अधिका-यांच मनापासून महापालिकेच्या माध्यमातून अभिनंदन कराव अशाप्रकारचा उचित, चांगला असा कार्यक्रम याठिकाणी संपन्न झालेला आहे. विविध ठिकाणी किफायतशीर पण कार्यक्षम अशी वैदयकीय सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देणे. मनपाच्या शाळामध्ये ई-क्लासरुम प्रकल्प राबवून शैक्षणिक गुणवत्ता वृध्दी करणे. नागरवस्ती विभागामार्फत शहरातील मागासवर्गीय, गरीब, दिव्यांग, महिला आणि वंचित घटकांसोबत काम करुन त्यांचा जीवनस्तर उंचावणे. मागच्या वर्षी या विभागातन खुप चांगल्या पध्दतीच कामकाज झालेल आहे. जवळपास पंच्याऐंशी टक्के खर्च या विभागातून संपन्न झालेला आहे. शहरातील दोन प्रमुख नदया पवना आणि इंद्रायणी यांच्यावर नदी सुधार प्रकल्प राबविण्याचे देखील नियोजन करणेत येत असून या प्रकल्पाकरिता कर्जरोख्या मार्फत विशेष निधी उभारण्यात येईल. या नदी सुधार प्रकल्पाच्या संदर्भामध्ये मला सांगायला आनंद वाटतो की या नदीमध्ये जे दुषीत पाणी या शहराच्या ड्रेनेज आणि विविध कंपन्याच्या मार्फत जे डायरेक्ट नदीमध्ये मिश्रीत होतं त्या संदर्भातील प्रथम निव्दिा आपण याठिकाणी जवळपास पवनाची दिडसे कोटी आणि पन्नास कोटीच्या जवळपास इंद्रायणी नदीच्या संदर्भातल डीपीआर याठिकाणी तयार आहे. आजच्या मिटींगमध्ये प्रशासकीय मान्यता होईल. त्यानंतर लवकरात लवकर पहीली दोनशे कोटीची निवीदा काढू शकतो अशाप्रकारची प्रशासनाकडन तयारी केली गेलेली आहे. एक उत्साहपुर्ण काळजीवाहक शहर घडविण्याकरीता क्रिडा संस्कृती यांचा विकास त्यामध्ये प्राधिकरण अदयावत नाटयगृहाची निर्मिती करणे.

'

आण्णासाहेब मगर स्टेडीयमचा पुर्नविकास करणे तसेच शहरात विविध ठिकाणी क्रिडा व सांस्कृतीक सुविधांची निर्मिती करणे. शहरातील उदयानांची सुधारणा करुन त्यात विरंगुळा केंद्र वगैरे बाबी जेष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध करुन देणे. अंत्यविधीकरिता विवीध समाजासाठी असलेल्या स्मशानभूमी, दफनभूमी इत्यादींचे पर्यावरणपूरक पध्दतीने नुतनीकरण करणे. शहरात विवीध ठिकाणी मोठया संख्येने वृक्ष लागवड करणे. चाफेकर स्मारक समितीच्या माध्यमातून शहराचा ऐतिहासिक वारसा जतन करण्याकरिता संग्रहालयाची निर्मिती याठिकाणी आपण करतो त्याच मागच्या काळात आदरनीय मुख्यमंत्री यांच्या शुभहास्ते उदघाटन सुध्दा या शहरामध्ये संपन्न झालेल आहे. पर्यटन वाढीकरिता बर्ड व्हॅली येथे लेझर शो, भक्ती शक्ती उदयानात लाईट ऍण्ड सांऊंड शो, बालनगरी प्रकल्प आणि शाहू सृष्टीची निर्मिती करणे अशाप्रकारचा अंतर्भाव या अर्थसकल्पामध्ये आहे. शहरातील नागरिकांकरिता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत परवाडणारी घरे मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देण्यासाठी मनपाच्या वतीने ५ ठिकाणी प्रकल्प राबविणे प्रस्तावित आहे. त्यासोबतच दापोडी येथील ५ झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्याचे प्रयोजन असून झोपडपट्टी निर्मुलनाचा पथदर्शी प्रकल्प राबविणे देखील प्रस्तावित आहे. शहरातील नामांकित विकसकांच्या मदतीने देखील परवडणारी घरे निर्माण करण्यावर मनपाचा भर राहीलेला आहे. मागचे पाच प्रकल्प याठिकाणी मंजूर झालेत, या वर्षी सुध्दा अजून डूडूळगाव आणि पिंपरीतला प्रकल्प असे दोन यावर्षी आपण मंजूर करु शकतो. त्या संदर्भातील प्रयत्न याठिकाणी चालू आहे. जीआयएस आधारित ईआरपीचा वापर सुरु करणे. कॅशलेस पेमेंट करिता सुविधा निर्माण करणे. स्मार्ट सिटी अंतर्गत स्मार्ट पाणीपुरवठा, स्मार्ट मलनिःसारण, स्मार्ट घनकचरा व्यवस्थापन, स्मार्ट पार्किग, स्मार्ट मोबिलीटी, स्मार्ट शिक्षण आणि स्मार्ट आरोग्य सुविधा इत्यादी योजनांचा वापर करणे. ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टीम निर्माण करणे. पर्यावरणपूरक सोसायटया निर्माण व्हाव्या याकरिता स्पर्धा आयोजित करुन विजेत्यांना करात सुट देणे. नागरवस्ती विभाग व समाजकल्याण विभागामार्फत वैयक्तिक लाभाच्या योजना राबवून थेट खात्यात लाभ उपलब्ध करुन देणे. सुरक्षा कायदा व सुव्यवस्था सुधारणे अशा संदर्भातील अंतर्भाव या अर्थसंकल्पात आहे. सीसीटीव्ही कॅमेरांचा वापर करुन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी इंटिग्रेटेड कंमांड ऍण्ड कंट्रोल सेंटर स्थापन करणे. बेवारस पडलेल्या वाहनांचा बंदोबस्त करणे. नो पार्किंग व्यवस्थेची अंमलबजावणी करणे. शाश्वत आर्थिक विकास अशा संदर्भातील या अर्थसंकल्पात अंतर्भाव आहे. स्टार्टअप इनक्युबेशन सेंटर स्थापन करणे. शहरात वाणिज्य क्षेत्राचा विकास

,

करणे. शहरात टाऊन प्लॅनींग स्किमचा वापर करुन आयटी हब स्थापन करणे. सिटी सेंटर आणि डिस्ट्रीक्ट सेंटर यांचा विकास करणे. स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत पिपळेगुरव येथे व्हिजेल प्लाझा आणि पिंपळे सौदागर येथे कोकणे चौक प्लाझा निर्माण करणे. भविष्यवेधक कौशल्य निर्मिती करण्याकरिता कौशल्याधिष्ठीत कार्यक्रमांची याठिकाणी निर्मिती करणे. जमा होणारा एक रुपया कसा जमा होईल याचा तपशिल याठिकाणी मी मांडू इच्छितो. आरंभीची शिल्लक १३९१ कोटी व टक्केवारीमध्ये ३०.०९ आहे, स्थानिक संस्था कर १६३२ कोटी येणे अपेक्षीत धरलेले आहे त्याची टक्केवारीमध्ये ३५.३३ आहे. करसंकलन या विभागाकडून ४८२ कोटीची जमा अपेक्षीत केलेली आहे त्याची टक्केवारी १०.४३ आहे. गुंतवणूकीवरील व्याज व इतर १९८ कोटी जमा अपेक्षीत धरलेली आहे त्याची टक्केवारी ४.२४ आहे. पाणीपट्टी व इतर याच्यातून ६७ कोटी जमा अपेक्षीत धरलेली आहे त्याची टक्केवारी १.४६ कोटी आहे. बांधकाम परवानगी विभागातून ३५० कोटी अपेक्षीत धरलेले आहे त्याची टक्केवारी ७.५७ टक्के आहे. अनुदाने, महसुली व भांडवली एकत्र केलतर ८० कोटी जमा धरलेले आहे त्याची टक्केवारी १.७३ आहे. भांडवली जमा ३०३ कोटी मिळतील अशी अपेक्षा आहे त्याची टक्केवारी ६.५६ कोटी आहे. इतर विभागातून जमा होणारी रक्कम ११८ कोटी आहे त्याची टक्केवारी २.५६ आहे. अशी ही सर्व नऊ विभागातून अपेक्षीत रक्कम ४६२० कोटी याठिकाणी अपेक्षीत आहे व त्याची टक्केवारी एक रुपयाच्या हिशोबाने १०० टक्के पुर्ण होत आहे. खर्च होणारा एक रुपया कसा खर्च होईल याचा तपशिल याठिकाणी देवू इच्छितो – सामान्य प्रशासन विभागात ६२ कोटी खर्च होईल असं अपेक्षीत आहे त्याची टक्केवारी १.३४ आहे. शहर रचना व नियोजन या माध्यमातून ५० कोटी खर्च होईल असं अपेक्षीत आहे त्याची टक्केवारी १.०९ आहे. सार्वजनिक सुरक्षितता व स्थापत्य महसूली या माध्यमातून २०८ कोटी खर्च होईल असं अपेक्षीत धरलेल आहे त्याची टक्केवारी ४.५० आहे. वैदयकीय विभागाच्या माध्यमातून १७१ कोटी खर्च होईल असं अपेक्षीत धरलेल आहे त्याची टक्केवारी ३.७१ आहे. आरोग्य विभागाच्या माध्यमातून २४३ कोटी खर्च होईल असं अपेक्षीत धरलेल आहे त्याची टक्केवारी ५.२५ आहे. प्राथमिक इतर शिक्षण या माध्यमातून १९२ कोटी खर्च होईल असं अपेक्षीत धरलेल आहे त्याची टक्केवारी ४.१५ आहे. उदयान व पर्यावरण या माध्यमातून ८३ कोटी खर्च होईल असं अपेक्षीत धरलेल आहे त्याची टक्केवारी १.८० आहे. इतर विभाग सेवा ४९४ कोटी आहे त्याची टक्केवारी १०.७० आहे. क अंदाजपत्रक खर्च महसूली २४३ कोटी आहे त्याची टक्केवारी ५.२६ आहे. स्थानिक संस्था कर व करसंकलन ४५ कोटी आहे त्याची

,

टक्केवारी ०.९७ आहे. भांडवली खर्च २१३१ कोटी आहे त्याची टक्केवारी ४६.१३ आहे. कर्ज निवारण व इतर निधी अखेरच्या शिलकेसह ६९८ कोटी खर्च अपेक्षीत आहे त्याची टक्केवारी १५.१० आहे. असा हा सर्वाचा खर्च टोटल केलातर ४६२० कोटी आहे त्याची टक्केवारी १०० टक्के पुर्ण होत आहे. २०१९-२० चे अंदाजपत्रक जमेचा तपशिल- आरंभीची शिल्लक १३९० कोटी आहे, महसुली जमा २८६० कोटी आहे भांडवली जमा ३०३ कोटी आहे. असे एकूण ४५५३ कोटी अ आणि प अंदाजपत्रक आहे. क मध्ये महसुली जमा ६७ कोटी आहे त्याची एकूण जमा ६७ कोटी आहे. तीन्हीचा हिशोब करुन एकूण जमा १३९० कोटी आरंभीची शिल्लक आहे. २९२७ कोटी महसूली जमा आहे. ३०३ कोटी भांडवली जमा असे मिळून ४६२० कोटी रु. जमेचा तपशिल आहे. २०१९-२०२० चा मूळ अंदाजपत्रकाचा एकत्रित संक्षिप्त गोषवारा सर्व कोटीमध्ये आहे. आरंभीची शिल्लक १३९०.५२ कोटी, महसूली जमा २९२७.०६ कोटी, भांडवली जमा ३०३.२० कोटी, एकूण अ अंदाजपत्रक ४६२०.७८ कोटी आहे. केंद्र शासन पुरस्कृत योजना अंदाजपत्रक आरंभीची शिल्लक ८८६.९६ कोटी आहे, केंद्रशासन अनुदान १३५.२१ कोटी, राज्यशासन अनुदान ६६.६३ कोटी, केंद्रशासन पुरस्कृत मनपा हिस्सा २७१.०६ कोटी, यु.टी.एफ.फंड ५०.१२ कोटी, लाभार्थी हिस्सा केंद्र शासन पुरस्कृत प्रकल्प ११३.३४ कोटी, इतर जमा ३८.९३ कोटी, एकूण ब १५६२.२५ कोटी व एकूण अ + ब ६१८३.०३ कोटी अशाप्रकारचा जमा तपशिल आहे. तसेच खर्च तपशिल पुढीलप्रमाणे आहे- मनपा अंदाजपत्रक महसुली खर्च १७९१.४७ कोटी, भांडवली खर्च २१२९.६८ कोटी, कर्जनिवारण निधी १० कोटी, विकासनिधी पाणीपुरवठा ८७.५० कोटी, वाहन घसारा निधी ५ कोटी, केंद्रशासन पुरस्कृत मनपा हिस्सा १.८० कोटी, पीएमपीएमएलला निधी १९०.८२ कोटी, अमृत योजनाच्या माध्यमातून ७२.५० कोटी, पंतप्रधान आवास योजनासाठी ३६.३९ कोटी, स्वच्छ भारतसाठी १०.३८ कोटी, स्मार्ट सिटीसाठी १५० कोटी, घसारा निधी १५ कोटी, सातवा वेतन आयोग ८० कोटी, वेतन राखीव निधी १० कोटी, अखेरची शिल्लक ३०.२४ कोटी, एकूण अ ४६२०.७८ कोटी. ब) केंद्रशासन पुरस्कृत योजना अंदाजपत्रक महसूली खर्च ४.९७ कोटी, भांडवली खर्च १३५२.६८ कोटी, इतर खर्च अनामत परताव्यासह ७९.१४ कोटी, अखेरची शिल्लक १२५.४६ कोटी एकूण ब चा खर्च तपशील पाहीलातर १५६२.२५ कोटी आहे. एकूण अ आणि ब जर पाहीलतर ६१८३.०३ कोटी याठिकाणी आहेत. मागासवर्गीय कल्याणकारी योजनाच्या माध्यमातून आपण जर पाहीलतर शासनाच्या गाईडलाईन्स असतात, प्रत्येकाला ५ टक्के आणि भूसंपादनासाठी २० टक्के अशाप्रकारचा निधी ठेवावा लागतो मागासवर्गीय कल्याणकारी

'

योजना सन २०१८-१९ ला २८.८२ कोटी तरतूद होती. सन २०१९-२० ला ३३.१४ कोटी विहीत तरतूद होती यावर्षी तरतूद ५५.८५ कोटी आहे. अशाप्रकारचे यावर्षी बजेटच्या पाच टक्केप्रमाणे केलं आहे. क्रिडा निधी ५ टक्के आहे म्हणजेच ४१.१३ कोटी आपण सन २०१८-१९ ला आपण केलं होतं. यावर्षी ३३.१४ कोटी क्रिडा निधी विहीत आहे व यावर्षी तरतूद ४६.०५ कोटी आहे. त्याचप्रमाणे महिलांसाठी कल्याणकारी योजना ५ टक्के आहे सन २०१८-१९ ला ३३.९० कोटी होते या वर्षी ३३.१४ कोटी विहीत आहे यावर्षी तरतूद ४०.९५ कोटी आहे. त्याचप्रमाणे अपंग कल्याणकारी योजना ५ टक्के आहे सन २०१८-१९ ला १९.५३ कोटी होता २०१९-२० ची टक्केवारी ३३.१४ कोटी विहीत आहे. यावर्षी तरतूद ३३.१४ कोटी आहे. भूसंपादनासाठी आपण २० टक्के ठेवतो सन २०१८-१९ ला १२६ कोटी होते यावर्षी १३३ कोटी विहीत आहे व तरतूद १४० कोटी आहे. सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकाची वैशिष्टये विकास कामांसाठी केलेली तरतूद विभागवार सांगतो. स्थापत्यासाठी सन २०१८-१९ ला ९७६ कोटी तरतूद केली होती. यावर्षी चालू आणि नवीन काम एकत्रीत केलेतर १४२५ कोटीची तरतूद आहे. भूसंपादनासाठी सन २०१८-१९ ला १२६ कोटी तरतूद केली होती यावर्षीसाठी १४० कोटी आहे. विदयूतसाठी सन २०१८-१९ ला ६३ कोटी होती, यावर्षी १२३ कोटीची आहे. पाणीपुरवठासाठी सन २०१८-१९ ला २१ कोटी होती, यावर्षी २८ कोटी आहे. जलनि:सारण सन २०१८-१९ ला ६६ कोटी होती यावर्षी ९६ कोटी आहे. पर्यावरणसाठी सन २०१८-१९ ला २१ कोटी होती, यावर्षी २७२ कोटी आहे म्हणजे जवळपास २०० कोटी आपण नदी सुधार प्रकल्पासाठी करणार आहोत. प अंदाजपत्रक ४३ कोटी होते यावर्षी ४५ कोटी आहे. विकास निधी पाणीपुरवठा विशेष निधी सन २०१८-१९ ला ६६ कोटी होता यावर्षी ८७ कोटी आहे. अशा संदर्भातल अतीशय चांगल बजेट प्रशासनाच्या माध्यमातून आयुक्त साहेब आणि लेखा विभागाच्या माध्यमातून यामध्ये सर्व अंतर्भाव करुन स्थायी समिती समोर आचारसंहीतेच्या अगोदर सादर केलं होतं. मधल्या काळामध्ये आचारसंहिता लागली असल्यामुळे हे बजेट सर्वसाधारण सभेपुढे सादर करता आल नाही. आचारसंहिता कालखंडामध्ये आडीच ते तीन महीने आपला गेलेला आहे. सन २०१७-१८ आणि २०१८-१९ या दोन आर्थीक वर्षामध्ये पहील्या चेअरमन आदरणीय सिमाताई सावळे त्याच बरोबर दुस-या चेअरमन ममताताई गायकवाड या दोन्ही चेअरमनच्या वतीने खुप चांगले विकासाचे काम काढण्यात आली. दोन वर्षात मोठया प्रमाणात ती केली परंतु या वर्षी जी तरतूद आपल्याला उपलब्ध आहे खर म्हणजे त्याला स्किल वर्क खुप मोठया प्रमाणात रक्कम अपेक्षीत आहे. मा.महापौर साहेब,

,

आयुक्त साहेब आम्ही बसलो होतो यासंदर्भातल यावर्षी नवीन कामासाठी तरतूद कमी आहे ती आकडेवारी सांगू इच्छितो. स्थापत्य विभागासाठी दोन वर्षामध्ये काढलेली जी काही जूनी काम आहेत त्याला ८७४.१८ कोटी तरतूद लागणार आहे आणि नवीन कामासाठी ३०५.४६ कोटी रुपये या वर्षी आपल्याला उपलब्ध आहेत. बीआरटीएसच्या कामासाठी २४३.७७ कोटी जून्या कामाना तरतूद अपेक्षीत केलेली आहे. ५१.२३ कोटी या वर्षी नवीन कामासाठी बीआरटीएसच्या माध्यमातून होणार आहे. ईडब्ल्यूएससाठी ११.२० कोटी चालू कामासाठी रक्कम आहे. .८० कोटी नवीन कामासाठी आहे. पाणीपुरवठा १५.८४ कोटी जून्या कामासाठी तरतूद अपेक्षीत आहे आणि ११.७३ कोटी नवीन कामासाठी आहे. जलनि:स्सारण ४६.२६ कोटी खर्च मागच्या कामासाठी ठेवलेले आहेत आणि ८०.९२ कोटी नवीन कामासाठी तरतूद याठिकाणी अंतर्भाव केलेला आहे. विदयूतच्या माध्यमातून ५२.५२ कोटी मागच्या वर्षीच्या कामाचा खर्च करावा लागणार आहे आणि नवीन कामासाठी ६६.३३ कोटी याठिकाणी एवढा खर्च करावा लागणार आहे. अशा मध्यमातून खुप चांगला अर्थसंकल्प प्रशासनाने मांडलेला आहे. मागची शेवटची स्थायी समिती सभा २८ फेब्रूवारीला जी झाली त्यामध्ये काही स्टॅण्डीग समिती सदस्यांच्या आणि अन्य नगरसेवकांच्या उपसूचना २६७ कोटीच्या मंजूर केल्या होत्या. परंतु मधल्या काळामध्ये आचारसंहिता सुरु झाली व सदर बजेट जीबी पुढ येवू न शकल्या मुळे बायडिफॉल्ट बीपीएमसी ऍक्ट १०० अ प्रमाणे आयुक्तांनी आता चालू असलेल्या बजेटला त्यांच्या पध्दतीने त्यांनी नियमानुसार मंजूरी दिलेली आहे. म्हणून मधल्या काळामध्ये आपले जे मुख्यलेखापाल कोळंबे साहेब आहेत यांच्या माध्यमातून मधल्या काळात एक मिटींग केली. त्यामध्ये कोळंबे साहेबांच असं म्हणण होतं की आयुक्तांचेच बजेट याठिकाणी जी बी समोर सादर करा. म्हणून आचारसंहितेनंतर स्थायीची जी मिटींग झाली त्यामध्ये आम्ही त्या उपसूचना ज्या आहेत त्या निरस्त करुन मा.आयुक्तांच बजेट स्थायी समिती समोर सादर करण्याचा निर्णय स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्या माध्यमातून घेतला. त्या पत्रावर मा.महापौरांची मान्यता घेवून आजची ही सभा संपन्न होत आहे. या बजेटला आयुक्त साहेबांनी त्यांच्या नियमानुसार मंजूरी दिली असल्या कारणाने आयुक्तांचेच बजेट मंजूर करणे याठिकाणी अपेक्षीत आहे. आपण सर्वानी त्याला मंजूरी दयावी अशा प्रकारची विनंती आहे. या बजेटला सर्व सन्मा.सदस्याना माझी विनंती आहे की आयुक्तांच बजेट आपण मंजूर कराव मा.महापौरांना सुध्दा विनंती आहे की आयुक्तांचच बजेट याठिकाणी मंजूर कराव अशी विनंती राहील. आपण उपसूचना घेतल्यातर त्या उपसूचनांच्या

'

अंतर्भावासाठी, मधल्या काळामध्ये आयुक्त साहेबांनी त्या बजेटला मंजूरी दिली, डॅशबोर्ड इस्टीमेटसाठी तयार होता पण निवडणूकीच्या कामामुळे सर्व अधिकारी व्यस्त होते. आता डॅशबोर्ड तयार आहे. त्यामुळे उपसूचना न देता मा.महापौरांना विनंती आहे आपण हे मंजूर कराव अशाप्रकारची विनंती आहे. ज्या उपसूचना पुढच्या काळामध्ये नगरसेवकांच्या माध्यमातून घ्यायच्या आहेत त्या वेळोवेळी आपल्याला सर्वसाधारण सभेच्या माध्यमातून घेवू यात. मा.महापौरांच्या मान्यतेनी त्या त्यावेळेला ते करु यात. मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४१८ विषय क्रमांक – १

दिनांक – १५.६.२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/१८९४/२०१९, दि.०८/०२/२०१९

२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-४५११ दि.२८/२/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-४८०५ दि.३१/५/२०१९

४) मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४५११ दिनांक २८/२/२०१९ नुसार मा.आयुक्तांकडून आलेले पुढील प्रमाणेचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच केंद्रशासन पुरस्कृत योजनांसह महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरीबांसाठीचे "प" अंदाजपत्रक त्याचप्रमाणे या अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक कामीचे अंदाज/प्रस्ताव अवलोकन करणेत आले.

,

## अंदाजपत्रक "अ" "क" "प" व केंद्रशासन पुरस्कृत योजना अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २०१८-१९ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु. | सन २०१९-२० चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ)<br>१) | एकूण जमा | ४६,४३,५८,८०,३४८ | ४६,२०,७७,९७,००० |
| २) | एकूण खर्च | ३२,५३,०६,८०,१०२ | ४५,९०,५३,८४,४०० |
| ३) | अखेरची शिल्लक | १३,९०,५२,००,२४६ | ३०,२४,१२,६०० |
| ब)<br>१) | भाग-३<br>एकूण जमा | ५६,४६,२४,२७,३८४ | ५०,३०,१६,१५,३८४ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | ५६,४६,२४,२७,३८४ | ५०,३०,१६,१५,३८४ |
| क)<br>१) | केंद्रशासन पुरस्कृत योजना एकूण जमा | १४,६२,२०,६१,१५५ | १५,६२,२४,७७,००० |
| २) | केंद्रशासन पुरस्कृत योजना एकूण खर्च | ५,७५,२४,६१,००० | १४,३६,७९,३१,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | ८,८६,९६,००,१५५ | १,२५,४५,४६,००० |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेला दि.१८/०२/२०१९ रोजी सादर केलेले आहे. मा.स्थायी समिती सभेने मा.आयुक्त यांच्या अंदाजपत्रकात सुधारणा करून सदर सुधारणांसह मा.महापालिका सभेकडे ठराव क्र.४५११ दि.२८/०२/२०१९ अन्वये शिफारस करणेकामी मान्यता दिली असली तरी मा.लोकसभेची आचारसंहिता दि.१०/०३/२०१९ रोजी

,

लागू झाली असून दरम्यानच्या कालावधीमध्ये मा.महापालिका सभेपुढे सदर अंदाजपत्रक सादर होवू न शकल्याने मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेला सादर केलेल्या अंदाजपत्रकाची अंमलबजावणी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम १०० (अ) प्रमाणे सुरू करणेत आली आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १०० नुसार ३१ मार्च पुर्वी अंदाजपत्रक मा.महापालिका सभेने स्विकारणे अभिप्रेत आहे तथापि मा.लोकसभेच्या आदर्श आचारसंहितेच्या अंमलामुळे सदर अंदाजपत्रक मा.महापालिका सभेला सादर करता न आल्याने ते माहे मार्च ३१ पर्यंत अंतिमरित्या स्विकृत करता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. सबब मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीस सादर केलेल्या अंदाजपत्रकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली असल्याने ती यापुढेही चालू ठेवणे क्रमप्राप्त आहे. सबब मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ४५११, दिनांक २८/०२/२०१९ मधील सन्मा. सदस्यांनी सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकास सुचविलेल्या सर्व सुधारणा (सुचना/ प्रस्ताव) वगळून तसेच अंदाजपत्रक पुस्तक क्र.३ मधील पान क्र.२९० अ.क्र.१५ अन्वये पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील पवना नदी सुधार प्रकल्प राबविणे याऐवजी पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील पवना नदी पुर्नरूज्जीवन प्रकल्प राबविणे असा बदल करून यातील अंदाजपत्रकीय र.रू.३,६४,००,००,०००/- ऐवजी र.रू.१५,५७,००,००,०००/- अशी दुरूस्ती करणेस मान्यता देणेस तसेच त्यातील पान क्र.२९० अ.क्र.१७ अन्वये पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प राबविणे या ऐवजी पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील इंद्रायणी नदी पुर्नरूज्जीवन प्रकल्प राबविणे असा बदल करून यातील अंदाजपत्रकीय र.रू.२०,००,००,०००/- ऐवजी र.रू.१२,००,००,००,०००/- अशा दुरूस्तीसह मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कलम ९५ अन्वये मा.स्थायी समिती सभेला सादर केलेल्या सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे. तसेच साधारणपणे तीन महिन्यानंतर मा.विधानसभेची आचारसंहीता लागू होण्याची शक्यता विचारात घेता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आलेली कामे पूर्ण करण्यासाठी उपलब्ध कमी कालावधी विचारात घेता सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकातील प्रस्तावित सर्व कामांच्या नावासमोर नमुद अंदाजपत्रकीय रकमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता घेतल्यास त्या-त्या कामाची केलेली तरतूद त्याच वर्षात खर्च करता येईल. सबब, सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात नमूद केलेप्रमाणे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे अशी सर्व भांडवली व महसुली

,

कामे तसेच महसूली अंदाजपत्रकातील वस्तू व सेवांच्या खरेदीच्या लेखाशिर्षासमोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच ही प्रशासकीय मान्यतेची रक्कम निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यावर मंजूर निविदा रकमे इतकी राहिल यास मान्यता देणेत येत आहे. तरी महसुली व भांडवली अंदाजपत्रकाच्या सर्व नवीन कामांना त्यांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रकमांना तसेच महसूली अंदाजपत्रकातील वस्तू व सेवांच्या खरेदीच्या लेखाशिर्षासमोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर प्रशासकीय मान्यता देणेकामी मुळ ठरावात उपरोक्त नमूद सुधारणांप्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्त ठरावास मान्यता व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सबब, त्यानुसार मा.स्थायी समितीचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच केंद्रशासन पुरस्कृत योजनांसह महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे "प" अंदाजपत्रक त्याचप्रमाणे केंद्रशासन पुरस्कृत योजना अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व म.न.पा. हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे तयार करणेत येत असुन त्यास अंतिम स्विकृती देणेत येत आहे.

**<u>अंदाजपत्रक "अ" "क" "प" व केंद्रशासन पुरस्कृत योजना अंदाजपत्रक</u>**

| अ.क्र. | तपशिल | सन २०१८-१९ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु. | सन २०१९-२० चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ)<br>१) | एकूण जमा | ४६,४३,५८,८०,३४८ | ४६,२०,७७,९७,००० |
| २) | एकूण खर्च | ३२,५३,०६,८०,१०२ | ४५,९०,५३,८४,४०० |
| ३) | अखेरची शिल्लक | १३,९०,५२,००,२४६ | ३०,२४,१२,६०० |
| ब)<br>१) | भाग-३<br>एकूण जमा | ५६,४६,२४,२७,३८४ | ५०,३०,१६,१५,३८४ |

,

| | | | |
|---|---|---|---|
| २) | भाग-३ एकूण खर्च | ५६,४६,२४,२७,३८४ | ५०,३०,१६,१५,३८४ |
| क)<br><br>१) | केंद्रशासन पुरस्कृत योजना एकूण जमा | १४,६२,२०,६१,१५५ | १५,६२,२४,७७,००० |
| २) | केंद्रशासन पुरस्कृत योजना एकूण खर्च | ५,७५,२४,६१,००० | १४,३६,७९,३१,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | ८,८६,९६,००,१५५ | १,२५,४५,४६,००० |

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. १० मार्चला आचारसंहिता लागली त्याच्यानंतरच हे बजेट. आयुक्तांनी हे बजेट कामकाजासाठी सुरु केलेले आहे. नगरसचिवांकडे मिटींगसाठी ज्यावेळेला तुम्ही सूचना केल्या होत्या त्यावेळेला हे समजायला पाहीजे होत की आपल्याला या बजेटवर चर्चा करता येणार नाही. आज नवीन चेअरमन आहेत त्यांचा आनंद आपल्याला हिरावून घ्यायचा नाही, एक वेगळा आनंद असतो मी चेअरमन आहे हे बजेट वाचतो म्हणून. पण हे सुध्दा आपल्याला २० तारखेला घेता आल असतं मा.महापौर साहेब. या बजेटवर आज आपण चर्चा करणार नाहीत, काही नाही परंतु एवढया सगळया नगरसेवकांना आज तुम्ही बोलवलं. प्रत्येकाचा वेळ हा महत्वाचाच आहे. आज आम्हांला सुध्दा काही महत्वाची काम होती. परंतु पावसाळयाप्रमाणे काही उपसूचना अजून काही या बजेटमध्ये झालतर एक शहरातील जबाबदार व्यक्ती म्हणून आम्हांला येथे थांबण गरजेचे पडलं. असं येथून पुढे होवू नये. आज गरज नसताना ही बजेटची मिटींग

,

लावली गेली असं मी या सभागृहाला सांगू इच्छिते आणि नगरसचिवांनी येथून पुढे थोडस तरी सांगाव की या बजेटवर कुठेही काही बोलता येणार नाही. या बजेटमध्ये कुणालाही काही करता येणार नाही. परवाची जी मिटींग झाली त्यादिवशी सुध्दा हे बजेट करु शकला असता एवढच मा.महापौर साहेब मला सांगायच आहे. आता हे जेवढ वाचन केल त्यात कुणाला सुख असेल कुणाला दु:ख असेल, पुढच्या पावसाळयाप्रमाणे जनरल बॉडीला आपण उपसूचना घेवूच त्यावर काही म्हणायच नाही आम्हांला. परंतु या कामकाजासाठी सगळयांना इथे येवून थांबाव लागतं हा वेळ येथून पुढे वाचावा अशीच अपेक्षा आहे, एवढच सांगते आणि थांबते, धन्यवाद.

**मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज बजेटला मंजूरी मिळाली शहराच्या सुधारणेसाठी विकासासाठी हे बजेट एकमताने मंजूर झाल. हा ध्यास आपण घेवून चाललो परंतु प्रशासनाकडून या बजेटचा व्यवस्थीत वापर केला जात नाही. कारण शहरामध्ये बजेट चांगल्या कामासाठी खर्च केल जात आणि त्याला अतिक्रमणाचा विळखा बसला जातो. माझ्या प्रभागामध्ये अहिंसा चौक आहे, त्या चौकामध्ये विनापरवान्याच्या पाच-पंचवीस हातगाडया लागत होत्या, त्याला पालीकेनी परवानाही दिलेला नाही. ते रहदारीला अडथळा निर्माण करत होते त्याच्यामुळे दोन अपघातही झाले. एक प्रोफेसर लेडी नवीन आली होती तीचा अपघात झाला त्यामध्ये ती मयत झाली. त्याच्यानंतर तेथील गाडया बंद करण्याचा मी मनामध्ये विषय केला व तेथील नागरीकांनीही सांगीतल की खुपच त्रास होतो या गाडया बंद करा. म्हणून मी अतिक्रमण विभागाकड वारंवार प्रयत्न केला. एक दोन वेळेस कार्यवाही झाली परंतु त्याच्यातून असे निष्पन्न झाल की हाप्ते दिले जातात त्यामुळ ते बंद होत नाही. त्याच्यानंतर तेथे फुटपाथ करुन फॅब्रिकेशनच कंपौड टाकुन घेतलं. ते झाल्यानंतर सर्व गाडया बंद झाल्या. परंतु तेथे आईस्क्रिमच्या एक दोन गाडया लागत होत्या. त्या गाडयांना वारंवार विनंती केल्यानंतर त्या बंद केल्या नाही म्हणून मी एक दिवशी स्वत: जाऊन बंद केल्यातर त्या व्यक्तीनी मी पंधरा वर्षापासून इथ हा गाडा लावतो म्हणून पोलस चौकीमध्ये जाऊन माझ्या विरोधात तक्रार दाखल केली आणि दाखल करतानी तीथ त्याचा रोष एवढा होता की जसं काही मी चुकीच काम करतो आणि ती जागा पालीकेनी किंवा कोणीतरी त्याला भाडयाने दिली आहे. माझी एकच मागणी आहे की आपण जर हे शहराच्या विकासासाठी करतो आणि प्रशासन जर या गोष्टीला शिस्त लावू शकत नसेलतर आम्ही लोकांनी कार्यवाही केल्यानंतर आमच्यावर जर कार्यवाही होणार असेलतर येणा-या

,

काळामध्ये शहराची खुप विद्रूप परिस्थिती निर्माण होईल. माझी एकच मागणी राहील की जिथ जिथ जागा ताब्यात आहेत तीथ कारवाई करावी. अन्यतः प्रशासनाने कारवाई केली नाहीतर आम्हांला कारवाई करण्याची परवानगी दयावी. एवढी मी मागणी करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रक आयुक्त साहेबांनी जे दिले त्याला मंजूरी मिळाली त्याबद्दल मी आयुक्त साहेबांच अभिनंदन करतो. हे बजेट दरवर्षी आपण सभागृहामध्ये मांडतो व ते बजेट आपण पास करुन घेतो. पण काही गोष्टी अशा आहेत की आमच्या प्रभाग क्र. ३१ मध्ये गेल्या वर्षी भरपूर बजेटचे पैसे दिले. यावर्षी पण चांगल्या पध्दतीने आम्हांला बजेट दिलेल आहे. पण ब-याच गोष्टी मनामध्ये अटकतात कारण तुम्ही बजेट देतात पण ते विकास होण्यास कमी पडतात, विकास होत नाही. सिमेंटचे रोड चालू आहेत, बरेच सिमेंटचे रोड चालू असतानी ते सिमेंटचे रोड चांगल्या क्वॉलीटीचे होत नाहीत. तुमचे अधिकारी किंवा कॉन्ट्रॅक्टरदार चांगल्या पध्दतीने या बजेटचा उपयोग करत नाहीत. आमच्या प्रभागामध्ये २४X७ किंवा अमृत योजना ही योजना चालू आहे पण ती कशा पध्दतीने चालती, कशा पध्दतीने होती हे तुमचे अधिकारी तुमच्या पर्यंत ही माहिती पोहचवीत नाहीत. कारण यावर्षी या प्रभाग क्र. ३१ मध्ये एवढी बेकार परिस्थिती झाली २४X७ चे काम चालू असतानी एकीकडे खोदायचे आणि संध्याकाळच पाणी यायच ते जॉईंट केल्या जायच नाही. बजेट दयायच आणि कामच होत नाही. लोकांना सुविधा काय पाहीजेत, कशा पाहीजेत या पध्दतीने पोहचत नाहीत. पिंपरी चिंचवडला ३२ प्रभाग आहेत त्यामध्ये बरीच काम चालू होतात पण आयुक्त साहेब तुम्ही आमच्या प्रभाग क्र. ३१ मध्ये काटेपुरम चौकचे गार्डन किंवा काटेपुरम चौक ते रामकृष्ण मंगल कार्यालय असा सिमेंटचा रोड चालू आहे पण तुमची व्हिजीट कधी नाही. परवा दिवशी हाच रोड चालू असताना पाऊस पडल्यानंतर जे काही शेजारी ब्लॉक बसवले नव्हते, ड्रेनेजच्या लाईन गेल्यात त्यात एक मुलगा पडला. आयुक्त साहेब तुम्ही दरवर्षी बजेट देतात, आम्हांला जाणवत की बजेट म्हणजे काय की आपल्याला काम करण्यासाठी तुम्ही पैसे दिलेले आहेत. पण ते पैसे कुणासाठी देता हे नेमक कळतंच नाही. आम्हांला एवढच कळत की ते तुमच्या कॉन्ट्रक्टरदाराला का अधिका-याला देता कारण ते पैसे नीट खर्च होत नाहीत किंवा चांगल्या क्वॉलीटीची ती काम होत

,

नाहीत. आयुक्त साहेब तुम्ही बजेट भरपूर देता पण ते खालपर्यंत पोहचल्या जात नाही, काम नीट केल्या जात नाहीत. ते अधिकारी नीट काम करत नाहीत. कॉन्ट्रॅक्टरदार नीट काम करत नाहीत. माझ्याकड गांगर्डे गल्ली नं. १ मध्ये ब्लॉकचा रोड झालेला आहे तो सगळा पावसानी पंधरा दिवसातच वर आला. कशी काय तुमची क्वॉलीटीची काम. तुम्ही बजेट दिलेंल आहे, आज ३२ प्रभाग आहेत त्या ३२ प्रभागामध्ये तुम्ही कधी कामाची पाहणी केली का. कधी तुम्ही व्हिजीट केली का. कधी तुम्ही त्या कामावर जावुन तुमच्या अधिका-यांना किंवा कॉन्ट्रॅक्टरला बोलले का. कधीच बोलले नाही, फक्त बजेट दयायचे आणि खालच्यानी कसं करायच ते करा. ते नगरसेवक काय ओरडलेतर ओरडू दयात. आयुक्त साहेब दरवर्षी बजेट देतात पण खाली कॉन्ट्रॅक्टरदार काय करतो, अधिकारी काय करतो यासाठी आम्ही ओरडतोत, आम्ही स्वतः प्रभागामध्ये हिंडतोत म्हणून हे तळमळीने बोलतो. आम्हांलाही कळतयना रोड कसे चाललेत, पाण्याची लाईन कशी चालली. कधीही साहेब तुम्ही आमच्या प्रभागामध्ये व्हिजीट दिलेली नाही. तुम्ही स्वतः रोड पाहीलेले नाहीत. म्हणून हे मनापासून आम्ही बोलतोय. बजेटच्या निमीत्तानी मा.महापौर साहेब, आपण मला बोलण्यासाठी चान्स दिला त्याबद्दल आपले आभार मानुन थांबतो.

**मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. अंबरनाथ कांबळे हे पोटतीडकीने बोलत होते की आपल ब-याच ठिकाणी कुठल्या कामावरती लक्ष नाही. जे आपण कन्सलटंट नेमतो, किंवा कॉन्ट्रॅक्टर असतो याच्यावरती कुठेच लक्ष नाही. मी वारंवार पत्रव्यवहार केला आहे. कोकणे चौक ते काळेवाडी फाटा जो रिंगरोड होतो तीथ अजीबात कामाची क्वॉलीटी नाही. आजच बजेट चांगल झाल आहे, आपण बजेट दरवर्षी त्या भागामध्ये देतो पण काम करत असताना कॉन्ट्रॅक्टर कुठल्या पध्दतीने काम करतो याबाबतीत मला कुठलाच अधिकारी असे वाटत नाही की त्यांनी त्याबाबतीत कुठला पत्रव्यवहार केला आहे आणि त्यातून काही माहिती मिळवली. आजच सकाळी मी इंगळे साहेबांना फोन केला, पिंपळेसौदागरमध्ये लायसेन्स होल्डर असणारे २० च हॉकर्स होती आज पिंपळे सौदागरच्या संपुर्ण परिसरात २०० ते २५० हॉकर्स दिसतात. माझा प्रत्येक आठवडयाला फोन आहे तो त्या हॉकर्स साठी. कुठल्या संबंधित अधिका-यांनी दाखवावी की ती कारवाई केली. कुठलेच अधिकारी त्या भागात फिरत नाहीत. आम्ही फोन केला की म्हणणार आमच्याकडे बंदोबस्त नाही, आमच्याकड काहीच नाही. मग असा ही शहराचा बकालपणा

,

होणारना साहेब. ती स्मार्ट सिटी पण तीथली कॅन्सल करा. वारंवार सभागृहात, प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये आम्ही हाच विषय मांडतो. आमचा एक सहकारी शितल शिंदे त्याचा प्रभाग चांगला होण्यासाठी तो हॉकर्स काढायला गेलातर त्याच्यावरती गुन्हा दाखल होतो. आपण काय करता, खरतर आम्ही पाच वर्षासाठी आहोत, पुढच्या पाच वर्षात आम्ही येवू नाही येवू सभागृहात. तुम्ही लोक तर कायमस्वरुपी आहेत नां. पुढच्या काळात आम्ही असू किंवा नसू पण शहर आपल सर्वांच आहे. इथे असणारे अधिकारी तर कायमस्वरुपी आहेत. तुम्ही लोक काय करता साहेब, प्रशासन म्हणून तुमची काही जबाबदारी नाही का. आम्ही काही सांगीतलतर बघतो साहेब, पाहतो साहेब, खड्डा बुजवायचा तर ती नगरसेवकाची जबाबदारी आहे का, लाईट गेलीतर नगरसेवकाला सांगायच ही आमची काम आहेत का. आज बजेट सादर केल आहे एवढा करोडो रुपये आपण खर्च करतो. याचा अर्थ प्रशासनावरती आपल कंट्रोल नाही. तुम्ही जे.ई., डेप्युटीची मिटींग घेता तर कधी विचारता का तुमच्या प्रभागात काय चालल ते. आपण सांगतो की या या भागामध्ये काही करायच असेलतर नगरसेवकाला फोन केला पाहीजे, कशाला फोन केला पाहीजे. या सिस्टीमवरती काम करणारे सर्व अधिकारी आहेत. जे.ई. आहेत, डेप्यूटी आहेत, कार्यकारी आहेत, सिटी ईंजि. आहेत. सिस्टीम काय काम करती साहेब आपल्याकड. आमच म्हणण एकच आहे की तुम्ही सिस्टीमवरती काम करा. आम्ही उदया असू, नसू आमचा काही संबंध नाही पण शहर हे सर्वांच आहे ते चांगल झाल पाहीजे. पण फक्त कागदावरती स्मार्ट सिटी, कागदावरती अपण सगळया गोष्टी बोलतो. ज्यावेळेस प्रत्यक्ष कामासाठी येतो की तुम्हांला पोलीस बंदोबस्त पाहीजे, तुम्हांला सगळया गोष्टी पाहीजेत. तुमच्या अधिका-याच्या गळयात आयडेन्टी कार्ड आहे तो जाऊन सांगू शकतो. पार्किंगला बजेट ठेवल काय करणार पार्किंगवरती बजेट ठेवून तुम्ही. मा.महापौर साहेब, कधी आपण ट्रॅफिक पोलीस आणि महापालिकेची मिटींग घेतली का. आपण चांगल शहर करण्याच्या पाठीमाग लागतो पण फक्त आपण टेंडरच्या पाठीमाग लागलोय. शितल शिंदे सारख्यांवर जर गुन्हा दाखल होत असेलतर आपले अधिकारी काय करतात. माझ एकच सांगण आहे साहेब, ट्रॅफिक पोलीस, तुम्ही, महापौर एकदा बसा. स्मार्ट शहर कधी होईल साहेब, तो पाई चालणारा माणुस जर चालूच शकत नाहीतर मी तर म्हणतो आजच्या बजेटमधुन फुटपाथ काढून टाका साहेब, फुटपाथ हा प्रकारच शहरामध्ये ठेवू नका. शहराच एक डिझाईनींग प्लॅनिंग नाही. ज्याच्या भागात आहे तसं प्लॅनिंग चाललय. माझ्या माहितीप्रमाणे तूषार कामठेकडे त्याठिकाणी सतरा कोटी रु.खर्च करतो. टाऊनप्लॅनिंगला

,

विचारा कुठली जागा स्वत:हून पझेशन दिली. काय करणार बजेट सादर करुन. वीस वर्षे झाली टिपी रिव्हीजन झाल पंचवीस टक्के जागा ताब्यात नाही. आजच्या भूसंपादनासाठी १४० कोटी ठेवले आहेत. पुढच्या जीबीला पहा तुम्ही प्रत्येकजण १४० कोटी भूसंपादनाचे वापरणार. मी वारंवार सांगतो पाच वर्षानंतर आम्ही नसू तुम्ही कायमस्वरुपी असणार आहेत. तुम्ही लोकांनी निर्णय घेतले पाहीजे. मा.महापौर साहेब, आपल शहर चांगल आहे, अजून चांगल होण्यासाठी अजून चांगले  निर्णय घ्या. आयुक्त साहेब, काही गोष्टी तुम्ही पण नाही म्हणायला शिका. हॉकर्स शहरात निघाले  पाहीजे. नाहीतर इतके चांगल फुटपाथ करणार खर्च करणार. अतिक्रमणबाबत पत्र दिलेल आहे, कुणावरतीतरी जबाबदारी निश्चित करा व निलंबनाची कारवाई करा. बिल्डींग परमीशन सकाळी गेलतर म्हणणार साईड व्हिजीटला गेलेत. बांधकाम पण त्यांनीच पाडायचे, हॉकर्स पण त्यांनी उचलायचे, होर्डीग्ज पण त्यांनीच काढायचे. आपण स्मार्ट सिटी करतो होर्डीग्ज  मधुन किती उत्पन्न आहे आपल्याला.१६ ते १७ कोटीच आहे, व आपण ते काढायच टेंडर काढलय १६ ते १७ कोटीच. माझ्या माहिती प्रमाणे शहरात कुठे होर्डीग्ज लावूच नका, किऑक्स लावू नका साहेब, निम्म शहर सुधारलेल दिसेल. आंबेडकर चौकातील होर्डीग्ज काढलेतर चौक चांगला मोठा दिसेल. कुठल्याही बाहेर शहरात जा, विदेशात जा तीथ होर्डिग्ज आहेत का किंवा किऑक्स आहेत का. आपण कायम शहराची स्मार्ट चर्चा करतो. शहर स्मार्ट होण्यासाठी या गोष्टीवर कारवाई करा. साहेब, तुम्ही ऍक्शन घ्या. या बजेटमध्ये आपल्याला होर्डिग्जसाठीचे १६-१७ कोटी नको चेअरमन साहेब. जे इलीगल पत्राशेड लोकांचे आहेत त्याला लावा टॅक्स. कुठला नगरसेवक तुम्हांला म्हणणार आहे का लावू नका टॅक्स म्हणून. याच्यावर तुम्ही कारवाई करत नाहीतर टॅक्स लावा. यातून शहर चांगल होईल. म्हणजे शितल शिंदे सारखा हॉकर्स काढणार आणि त्याच्यावरती गुन्हा दाखल होणार हे काही बरोबर नाही. एकतर गुन्हा अधिका-यावर दाखल झाला पाहीजे. वारंवार तुम्हांला माझ पत्र आहे साहेब, काय त्याच्यावर ऍक्शन झाली. रोज माझ्याकडे किमान तीन संघटनेचे लोक येतात साहेब, आडीचशे आडीचशे लोकांचे. तक्रारी येतात लोकांच्या की आम्ही पादचारी मार्गाने चालू शकत नाहीत. मा.महापौर साहेब, तुम्ही पोलीस, थोडीशी ऍक्शन घ्या. कुठला नगरसेवक हॉकर्सच्या पाठीशी नाही. सगळया  नगरसेवकांची मागणी आहे, धन्यवाद.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमतः मी प्रशासनाला आठवण करुन देतो की काल विषय समित्यांच्या सभापतीची निवड झाली त्यांचा

,

सत्कार राहून गेलेला आहे. मी याठिकाणी आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने चारही विषय समित्यांचे सभापतींचे अभिनंदन करतो आणि त्यांचा सत्कार याठिकाणी घ्यावा अशी मी विनंती करतो. याठिकाणी आताच स्थायी समितीचे अध्यक्ष विलासजी मडिगेरी यांनी बजेट मांडलेल आहे. आता बजेटवर बोलून काही बदल होणार नाही. परंतु अमच्या सारख्या नवीन नगरसेवकांना आमच्या विभागाला काय अडचण निर्माण झाली हे मांडायच आहे म्हणून मी याठिकाणी उभा आहे. आता जे बजेट मांडल त्याच्यामध्ये प्रभागवाईज जर तुलना केलीतर आपले आठ प्रभाग आहेत, त्याठिकाणी आता  जे चालू बजेट आहे आणि मागच्या वर्षीच जे काही असेल ते बघीतलतर सर्व प्रभागात अ ला ११५ कोटी आहे, ब ला १९० कोटी आहे, फ ला ९० कोटी आहे, ग ला ९८ कोटी आणि ह ला १४५ कोटी आहे. याठिकाणी मला सांगायच आहे की फ ला सर्वात कमी बजेट दिलेल आहे. सत्तारुढ पक्षनेत्यांचा, विरोधी पक्षनेत्यांचा वॉर्ड आहे. याठिकाणी ९० कोटीच फक्त बजेट आहे. आयुक्त साहेब अशी तफावत का आहे. काही ठिकाणी मोठे प्रोजेक्ट चालले आहेत ठिक आहे पण एवढी मोठी तफावत का. १९० कोटी, १०० कोटी आणि डायरेक्ट ९० कोटी अशी तफावत का आहे. सर्व शहराचा विकास याठिकाणी समतोल झाला पाहीजे. समतोल राखला पाहीजे. आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका ऐरीयामध्ये सर्वाधिक क्षेत्रफळ फ प्रभागात आहे. क्षेत्रफळ आल म्हणजे त्याठिकाणी तेवढे रस्ते आले. तेवढया ड्रेनेजची सुविधा आली, पाण्याची सुविधा आली या जर मुलभूत सुविधा दयायच्या असतील आणि जर एवढे कमी पैसे असतीलतर का नाही हा भाग याठिकाणी पाठीमाग राहणार. यामध्ये फ प्रभागामध्ये १२ नंबर माझा स्वत:चा आहे याच्यामध्ये क्षेत्रफळ जास्त आहे. आणि आम्हांला फक्त १० कोटीची तरतूद आहे. हा दुजाभाव का, त्याठिकाणी सर्वच प्रकारचे नागरीक राहतात. इलेक्शन आले की राजकारणी लोक त्या वेळेपुरते असतात.  प्रत्येक नागरीकांना आपण सेवासुविधा दयायला बांधील आहोत मग हा दुजाभाव का. मागच्या वर्षी पण मी हे बोललो होतो तरी पण यावर्षी तीच परिस्थिती आहे. आमच्या फ प्रभागामध्ये सगळयाच पक्षाचे नगरसेवक आहेत. राष्ट्रवादीचे, भाजपचे, सेनेचे, मनसेचे सगळयाचे आहेत. मग सर्वाना सारखा न्याय का नाही. आपल्या महापालिकेच सर्व नागरीकांना सेवासुविधा पुरविण हे अद्य कर्तव्य आहे मग आपण त्यापासून का लांब जातो. या सभागृहामध्ये आपण नागरीकांचे प्रश्न मांडण्यासाठी एकत्र आलोत. इथ आपल्याला आपल्या नागरीकांना सेवासुविधा दयायच्या आहेत. म्हणून मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्याला विनंती आहे की येथून पुढच्या काळामध्ये ज्यांना येथे कमी बजेट

,

मिळालेल असेल त्यांना उपसूचनांच्या माध्यमातून बजेट दयावे. एकीकडे आपण स्मार्ट सिटी करायला चाललो आणि एकीकडे रस्त्यासाठी आम्हांला भांडायला लागतं, आम्हांला याठिकाणी ड्रेनेज लाईन निधी साठी भांडायला लागतय. हा कसला समतोल आहे. एकीकडे आपण शहर स्मार्ट करायचो आणि एकीकडे आजही रस्त्यासाठी भांडतोय. आज आयुक्त साहेबांना सांगायला गेलोतर त्याठिकाणी रेडझोन आहे ते आहे हे आहे असं सांगीतल जातं हे मला मान्य आहे पण आमची मागणी पण त्याठिकाणी त्या विषयाला अनुसरुनच आहे. रेडझोन जरी असलातरी त्याठिकाणी व्हर्टीकल डेव्हलपमेंट न करता आपण हॉरीजेण्टल करायला काय हरकत आहे. एवढया मोठया क्षेत्रफळाचा आमचा १२ नंबर प्रभाग आहे. संपुर्ण प्रभाग रेडझोनमध्ये येतो, चिखली पण प्रभाग रेडझोनमध्ये येतो. त्याठिकाणी रस्ते विकसीत करु शकत नाहीत आपण. कारण की आज त्याठिकाणी मोठया प्रमाणात इन्डस्ट्रीअल आहे, लोक राहतात. आज एवढी मोठी चाकण एमआयडीसी आहे, म्हाळूंगे एमआयडीसी आहे त्याठिकाणी एमआयडीसीच्या ब्रीज जोडल्यामुळ आमच्या भागात एवढी वाहतूक समस्या गंभीर झालेली आहे, तुम्ही पण त्याठिकाणी ब-याच वेळा व्हिजीट केली. त्याठिकाणी पर्यायी रस्ता नको का. आज एवढी लाखो लोक नाशिक हायवेचा अवलंब करतात आणि दुसरा तळवडेचा अवलंब करुन पिंपरी चिंचवड सिटीला आणि पुणे सिटीला जोडतात. त्याठिकाणी रोज ट्रॅफिकच्या माध्यमातून ऍक्सीडेंट होतात, तीथल्या स्थानिक नागरीकांना नाहक त्याचा त्रास होतो, ठिक आहे लोक त्याठिकाणाहून ये-जा करतात पण स्थानिक नागरीकांना त्याचा काही फायदा नाही. त्याठिकाणी पर्यायी रस्त्याची फार मोठी गरज आहे. आयुक्त साहेब मी बराचवेळा तुमच्याकडे त्या माध्यमातून आलो. आमच्या रस्त्याला पर्यायी रस्ता सुचवलेला आहे. पर्यायी रस्ता सुचवला असतानी नागरीकांना त्याचा मोबदला मिळाला पाहीजे. कारण आज आपण भूसंपादनासाठी १४० कोटी ठेवलेत. त्यातले पैसे खर्च झाले नाही की आपण ते पैसे वर्ग करुन दुसरीकडे वापरतो. पण आज याठिकाणच्या या मोठया समस्या आहेत त्या समस्याला हे पैसे वापरु शकत नाहीत का. आमच्या चिखलीतला रस्ता वीस वर्षात नागरीकरण झाल नाही का. वीस वर्षामध्ये बाकीचे उदयोग वाढले नाहीत का. सगळयात जास्त इन्डस्ट्रीज आमच्या ऐरीयामध्ये आहे मग त्याठिकाणी पर्यायी रस्त्याची व्यवस्था नको का. आमच्या प्रभागातले ऍक्सिडेंटनी किती लोक जातात. गेली दोन ते आडीच वर्ष मी त्या तळवडेच्या रस्त्यासाठी भांडतो. नगररचना विभागात जातो. जो तळवडे चिखली शिव रस्ता आहे तो आपल्याला एमआयडीसीला जोडायचा आहे. त्यामुळे चार पाच प्रभागातली ट्रॅफिक सॉल्व्ह होणार आहे.

,

पण त्याकडे कोणी लक्षच देत नाहीत. मी गेल्या दोन वर्षात लोकांना विनंती करुन जागा ताब्यात दिली. काही नागरीक चिखली भागातील असतील, तळवडे भागातील असतील, भालेकर कंपनी असतील, ताम्हांणे कंपनी असतील याठिकाणी रस्त्याला जागा दयायला तयार आहेत. पण मोबदल्याचा काहीच विषय नाही. याठिकाणी सांगीतल जात रेडझोनच्या माध्यमातून ५० टक्केच मिळणार. त्याठिकाणी रेडीरेकनर दर चार ते साडेचार लाख आहे नागरीकांना जर दुप्पट दिलतर ते खुशीने आपली जमिन रस्त्यासाठी देतील. कारण की नागरीकांना त्याठिकाणी रस्त्याची गरज आहे. माझी याठिकाणी खास विनंती आहे की गेली दोन वर्षे मी याचा पाठपुरावा करतो यासाठी शेतक-याना त्याचा मोबदला जर येणा-या काळामध्ये दिलातर सर्वात मोठा आमच्या भागातील हा प्रश्न मिटेल. म्हणून मला याठिकाणी सांगायचे आहे की आपण जे भूसंपादनावर १४० कोटी रु. ठेवले आहेत त्याच्या माध्यमातून निश्चितच याचा विचार करावा आणि येणा-या काळामध्ये त्याठिकाणचा लोकांना मोबदला दयावा. त्या रस्त्याचे आपण टेंडर काढण्याच्या तयारीत आहेत. निश्चितच हा प्रश्न आपण येणा-या काळात मार्गी लावण्याच्या दृष्टिने माझी विनंती आहे. २४X७ योजनेचे सगळीकडे आपण काम चालू केले आहेत. सगळयात जास्त काम माझ्या प्रभागात झालेल आहे. कारण की पन्नास टक्केच्या वर काम झाल आहे. मला अस सांगायच आहे की रस्ता दुरुस्तीसाठी त्यामध्ये काहीच तरतूद नाही. सगळयाच्या तरतूदी ठेवलेल्या आहेत. २४X७ योजनेचे कामाची क्वॉलीटी अजीबात नाही. तेथे लाईन टाकलीतर दोन दोन महीने तसेच राहते त्यामुळे लोकांचे ॲक्सिडेंट होतात. त्यामुळे आपण प्रत्येक प्रभागाला जर यासाठी काहीतरी तरतूद दिलीतर २४X७ योजनेचे डांबरी करण करणे स्ट्रेचेस भरणे. पण यामध्येतर ते कुठेही दिसत नाही. मग बाकीचे रस्ते कसे करायचे त्याच डांबरीकरण कसे करायच. तरी पुढील जीबीमध्ये उपसूचना मांडून प्रत्येक प्रभागासाठी त्या योजनेच्या डागडूजी करण्यसाठी अपण निधी दयावा अशी मी आपल्याला विनंती करतो. आताच बापू काटेनी सांगीतल की शितल शिंदे आपल्या प्रभागामध्ये जे काही हॉकर्स झोनसाठी प्रयत्न करत होते, आज प्रत्येक नगरसेवकाला वाटते की माझा वॉर्ड चांगला असावा, तीथे कुठेही अतिक्रमण नसाव. पण त्याठिकाणी जर नगरसेवकांवर गुन्हा दाखल होत असेलतर ही अतीशय निंदनीय बाब आहे. मग प्रशासन काय करतय. ही अतीशय चुकीची बाब आहे. निश्चितच याठिकाणी प्रशासन पुढील काळात अतीक्रमण हाटवण्यासाठी नगरसेवकांना मदत करतील अशी आशा बाळगतो. मा.महापौर साहेब, आपण मला याठिकाणी आज बोलायला संधी दिली, मी दोन तीन विषय

,

मांडले त्याचा येणा-या काळात आपण विचार कराल अशी मला आशा वाटते. मला बोलायला संधी दिली त्या बद्दल मी आपले आभार मानतो आणि याठिकाणीच थांबतो, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजची ही जनरल बॉडी आपण फक्त बजेटसाठी बोलवली. अशा बजेट साठी बोलवली ते बजेट इम्प्लीमेंट झाले, मगा सांगीतल की बजेटवर चर्चा करता येत नाही कारण ऑलरेडी हे बजेट इम्प्लीमेंट होतय. तरी आपआपल्या भागातील अडचणी ते ते नगरसेवक आपल्याला सांगातात. हे करत असताना हॉकर्स झोनचा विषय निघाला. शितल शिंदे सारख्या एका नगरसेवकांवर की जो रात्रंदिवस लोकांसाठी काम करतो अशा नगरसेवकांवर ज्यावेळेस तक्रार करण्याची वेळ येते आणि त्यानंतर कारवाई होते. मग आपल प्रशासन करतय काय. आपले अधिकारी काय करतात. आज हातगाडी नेली म्हणून खोटी तक्रार देत असेल की मला शितल शिंदेनी मारल, मला धमकी दिली आणि तसा गुन्हा दाखल होत असेलतर साहेब कुठतरी तुमच्या अधिका-यांना तुम्हांला जागेवर आणता येइल तस आमच्या मागेही उभा रहावे लागेल. तुम्ही स्वतःकमीशनर साहेबांशी बोलायला पाहीजे होतं की अशा पध्दतीने ही घटना आहे. याच्यावर कुठेतरी ईलीगल हॉकर्सवर कारवाई केली गेली त्याच्यामुळे जर सुडबुध्दीने लोक अशी तक्रार करत असतीलतर साहेब कुठेतरी या लोकांमध्ये प्रचंड प्रमाणात डेअरींग वाढेल आणि शहर अजून विद्रूपीकरणाकडे जाईल. साहेब, कुठेतरी आपल शहराकड लक्षच नाही. नक्की आपले दौरे, सुट्टया याच्यातन इलेक्शन फेवर मधुन आपण अजून बाहेर निघालेला नाहीत. आंबरनाथ कांबळेनी काय सांगीतल तुम्ही आलेच नाहीत, तुमच लक्षच नाही, तुम्ही प्रभागात आजपर्यंत आलेच नाहीत. म्हणजे कुठेतरी ही चर्चा करण्याची वेळ सभागृहावर येते. कुठेतरी आपण स्वतः या गोष्टीला कारणीभूत आहात. जो कोण इसम आहे किशोर गाडरी ज्यानी शितल शिंदे विरुध्द तक्रार दिली त्याच्या विरुध्द पण तुम्ही तो ईलीगल गाडी लावतोना गुन्हा दाखल करा. आपल्या प्रशासनामार्फत त्याच्यावर कारवाई करा. त्याच्या शहरात वीस ते पंचवीस हातगाडया असतील. त्याच्या गाडयाला तुम्ही परवानगी दिलेली आहे का. दुस-या बाजूला आता शत्रुघ्नने सांगीतल की आपल्याला होर्डीग्ज मधुन उत्पन्न फक्त १४ कोटी येते आणि आपण त्याच्यावर कारवाई करण्यासाठीच टेंडर काढलय सात ते आठ कोटी रुपयाच. हा किती मोठा विरोधाभास आहे, तुम्हाला वाटत असेलना की शहर विद्रूप होत तर बंद करुन टाकाना ते होर्डीग्ज. दिल्लीमध्ये तो कायदा आहे, ब-याचशा राज्यात तो कायदा आहे, नाही

,

देत होर्डीग्जला परवानगी. जर एवढ तुमच उत्पन्न येत असेलतर तुम्ही लावून टाका. खर्च जास्त आणि उत्पन्न कमी. कुणासाठी पोसतात तुम्ही हे लोक. ईलीगल एवढे होर्डीग्ज लागत असतीलतर कुणासाठी हे चाललं आहे. तुम्ही दहा-दहा, वीस-वीस गाडी लावत असाल आणि कारवाई करायला गेलेतर खोटी तक्रार देत असतीलतर कशासाठी, तुम्ही कुणासाठी हे करता साहेब, आमच्या प्रभागात तुम्ही चक्कर मारा. बघा किती गाडया ईलीगल लागलेल्या आहेत.तुमचा साहेब एकतर अधिका-यांवर कंट्रोल दिसत नाही. आता एक सिटी ईंजिनीअर नाशीकहून, नाशिक महापालिकेनी त्याना घेतल नाही म्हणून ते आपल्या शहरात आले. का शहरात सक्षम अधिकारी नाहीत का, नाहीतरी शहराची माहिती नसलेले सगळे अधिकारी घेवून या. पक्षनेते आपल्यालाच निर्णय घ्यावा लागेल. ज्या अधिका-याला नाशिक महापालिकेनी स्विकारल नाही त्याची ऑर्डर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला आली. मग पिंपरी चिंचवड महापालिका असे अधिकारी घेणार आहे का. म्हणजे याचाच अर्थ तुम्ही आहे त्या अधिका-याना नीट कामाला लावत नाही दुस-या बाजुला तुम्ही शासनाकडन अजून अधिकारी आणायचे. का तुमच्याकडे सक्षम अधिकारी नाही का, तस असेलतर तुम्ही कबुल करा. याच्यातला एकही सक्षम नाही म्हणून बाहेरुन आणता येईल. त्याला शहराची माहिती करुन दया तेथून पुढ तो कामाला लागेल. ज्या पध्दतीने हा सगळा कारभार प्रशासनाचा भोंगळ चालला आहे तो थांबला पाहीजे. तुमच बजेट आहे असं इम्प्लीमेंट केल गेलेल आहे. मडिगेरी साहेबांनी तो जो मान आहे तो मिळवला आहे, ते वाचल आहे. जस अंबरनाथ कांबळेनी सांगीतल, प्रविणने सांगीतल इंम्पलीमेंटतरी व्यवस्थित करा. कागदावर नको, जागेवर करा. आज तुम्ही एका बाजुला होर्डीग्जने विद्रूपीकरण करणार, दुसया बाजुला हातगाडया तीस-या बाजूला तुम्ही पावसाळयात पण ईलीगल कारवाई करता. आपले किती भूसंपादनाचे विषय जिल्हाधिकारी यांचेकडे पेन्डींग आहेत. त्याचा तुम्ही का फॉलोअप घेत नाहीत. म्हणजे तुम्ही ठरावीक भागात ठरावीक लोकांनी सांगीतल्यानंतर त्याठिकाणी कारवाई करता अशा प्रकारची मानसीकता सर्व शहरातील नागरीकांची झाली आहे. सरसकट कारवाई एकतर बंद करा नाहीतर सरसकट लोकांवर तुम्ही कारवाई करा. चाललय काय हे. ज्याच्या भागात ईलीगल होईलना त्या अधिका-यावर कारवाई करा. तुम्ही एकतर बिल्डींग परमीशनला चार्ज दिला. स्थापत्यला सांगड घालानां साहेब, दुपार पर्यंत एकही अधिकारी जागेवर नाही, कुठे तर कारवाईला गेला. परत तो कधी कधी पोलीस परमीशन देतो, कुठेतरी आपल्याकड पण सक्षम कारवाई करण्यास अधिकारी नाही. दुस-या बाजूला कारवाई करायला तुम्ही गेलेतर

,

ते आमच्या नावाने ओरडतात. तुम्ही सगळया शहरात एक पॉलीसी निर्णय घ्या आणि सगळया शहरात तो इम्प्लीमेंट करा असं तुम्हांला करता येत नाही का. नाहीतर कबूल करुन टाका करता येत नाही म्हणून मी नवीन सिटी ईंजिनीअर आणला त्याच्या ताब्यात सगळ देवून टाकतो. म्हणजे कुठेतरी साहेब या गोष्टीत तुम्हांला सुसूत्रता आणावी लागेल. दोन वर्षे झाले तुम्ही शहरात काम करताय, शहर तुमच्याकडे आशेनी बघतय साहेब. पुण्यात मध्ये उदा. आहे साहेब, कुणालकुमार यांच. पन्नास पन्नास वर्षाच्या टप-या कधीच निघून गेल्या. त्याबद्दल कुठेही चर्चा नाही. या सगळया गोष्टीकड साहेब तुम्ही लक्ष दया. लोकप्रतिनिधी आपआपल्या भागातील याठिकाणी समस्या मांडतात. सर्वाचा रोष जर पाहीलातर सर्व आयुक्त साहेब, आयुक्त साहेब, आयुक्त साहेब करतात. मा.महापौर साहेब, तुम्ही पण साहेबांना सभागृहाच्या वतीने एक आदेश दयावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजच्या या बजेटच्या मिटींग निमीत्त आयुक्तांनी जे बजेट मांडल ते विलास दादांचच बजेट ते तांत्रिक अडचणीमुळे फक्त आयुक्तांनी मांडल त्याच मी अभिनंदन करतो आणि हे बजेट एक चांगल्या पध्दतीने तयार केल गेलेल आहे त्यात काही शंका नाही. कारण विलास दादासारखा अभ्यासू माणूस हे बजेट तयार करतो आणि आपल्या समोर मांडतो. शेवटी माणूसच आहे थोडयाफार चुका होतच असतात. याच्यामध्ये काही चुका आमच्या निदर्शनास आल्या त्या मांडू इच्छितो. या बजेटमध्ये आपण पवना सुधार प्रकल्पासाठी साधारण २०० कोटीची तरतूद करतो. परंतु शहराला त्या पवनेचा पुर्ण पाणीपुरवठा पिण्यासाठी केला जातो. त्या पवनेवरती दुषीत पणी आणि स्वच्छता याच्यासाठी आतापर्यंत आपण काय काळजी घेतली किंवा आतापर्यंत आपण किती खर्च करतो याचा थोडासा लेखाजोखा आपण जर पाहीलातर त्याच्यावरती आपला काहीच खर्च झालेला दिसत नाही. वास्तविक शहराला बंद पाईप योजनेची गरज आहे तेव्हा पुर्ण शहराला पाणीपुरवठा सुरळीत होवू शकतो. आज आपण पाणी टंचाईला सामोर जातो आणि तेही भर पावसाळयामध्ये. जून महीना चालू होवून सुध्दा आपण पाणी टंचाईला सामोरे जातो ही परिस्थिती आपल्यासाठी लाजीरवाणी आहे. याच नियोजन करण्यात आपण कुठेतरी कमी पडतो. आजच्या या बजेटच्या मिटींग संदर्भात आपण चर्चा करणं उचित नाही परंतु ज्या गोष्टी समोर आणणं गरजेच आहे, ज्याच्यावरती चर्चा होणं गरजेच आहे त्यासाठी पोटतीडकीने आमचे सहकारी अंबरनाथ कांबळे असतील, बापू काटे असतील, राहूलदादा

,

असतील, शितलदादा असतील या सर्वानी आपल मनोगत मांडलेल आहे. शहरामध्ये विवीध प्रकारचे प्रश्न आ वासून आपल्या समोर उभे आहेत. बजेट करताना जमा आणि खर्च या दोन गोष्टींचा विचार केला जातो. जास्तीत जास्त जमा कसे होतील आणि ते जास्तीत जास्त खर्च कसे करता येतील याचा वर्षभराचा एक ताळेबंद किंवा त्याचा पुर्व विचार करुन आपण ते बजेट तयार करतो. पण हे बजेट तयार करत असताना जमा आणि खर्च एवढाच विचार न करता नागरीकांच्या सुविधांचा जास्तीत जास्त कसा विचार केला जाईल तो विचार याच्यात कुठ जास्त झळकताना दिसत नाही. जमा झाले आणि ते खर्च केले म्हणजे बजेट सक्सेस झालं असं नाही तर नागरीकांना आपल्याकडन जास्तीत जास्त काय सुविधा दिल्यात किंवा काय सुविधा देण्याचा आपण प्रयत्न करतो याचा पण जास्त विचार करण गरजेच आहे. आज पावसाळा सुरु झाला आहे, शहरात अनेक नाले आहेत. बरेच नाले फक्त कागदावरच साफ झाले आहेत अशा बातम्या वर्तमानपत्रामधुन येत असतात आणि ब-याच ठिकाणी वस्तुस्थिती पण पाहीला भेटते. नाले साफ होण हा भाग वेगळा आणि नाले साफ करुन काढण म्हणजे बुजवून टाकणे हा भाग वेगळा. आज माझ्या प्रभागाच्या जवळचा एक नाला बुजवून टाकलेला आहे. कस्पटे वस्तीतले, तुषारदादांच्या वॉर्डातले दोन नाले बुजवून टाकलेत. ही खुप गंभीर बाब आहे. या गोष्टीवरती विचार करण आणि कृती करणं या दोन वेगवेगळया बाबी आहेत, नुसतच विचार करण्याची आता वेळ नाही, कृती करायची वेळ आहे. तरी आपल्याकडन कृती झाली पाहीजे. आणि अशा गोष्टी करणा-यांच मन पुन्हा धजावल नाही पाहीजे असे काहीतरी कठोर शासन त्याच्यावरती झाल पाहीजे एवढी अपेक्षा व्यक्त करतो तसेच हॉकर्स पॉलीसी वर जी काही चर्चा करतो, मागच्या दोन वर्षामध्ये ब-याचवेळा त्याच्यावरती चर्चा झाल्या. पण अजूनही कुठल्याच ठोस निर्णयापर्यंत आपण पोहचलेलो नाहीत. शहरामध्ये येणा-या प्रत्येक नागरीकाला इथे भाकरी मिळाली पाहीजे. कष्टकरी असु दयात, कुणीही असु दयात, कामगार नगरी म्हणून आपल्या पिंपरी चिंचवडच नाव सर्व देशात प्रसिध्द आहे. पण येणारा कामगार असू दयात किंवा हातावरच पोट भरणारा माणुस असु दयात त्याला व्यावसाय करायची परवानगी आपण दिली पाहीजे. पण त्या सोबत रहदारीला कुठे अडचण झाली नाही पाहीजे याची सुध्दा दक्षता आपण घेतली पाहीजे. आणि शितलदादा तेच करत होता पण ते करताना त्याच्यावरती गुन्हा दाखल झाला. त्याच्यावरती गुन्हा दाखल झाला म्हणजे आपल्या सगळयावरतीच गुन्हा दाखल झाला अस समजून आपण त्याच्या पाठीशी उभ राहील पाहीजे. त्याच्या सोबत आपण राहील पाहीजे. प्रॅक्टीकली त्यावर काहीतरी कारवाई झाली पाहीजे.

,

तसेच मागच्या वर्षी आमचे सहकारी तुषारभाऊ कामठे यांनी सुध्दा किऑक्सच्या विरोधात छोटस आंदोलन केलं होतं. त्या वेळेस त्यांच्यावरती एक गुन्हा दाखल झाला होता. तो गुन्हा दाखल झालेला असताना आज त्याच माणसाला म्हणजे ज्यांनी आपल्या नगरसदस्यांवरती गुन्हा दाखल केला त्याच माणसाला पुन्हा किऑक्सच टेंडर दिलं गेलं याचा अर्थ काय आणि याची गरज काय. म्हणजे जे लोक अरेरावी करतात, नगरसदस्यांना दमदाटी करुन, गुन्हे दाखल करतात त्यांनाच आपण परत पोसण्याच काम करतो आणि त्यांना का पोसल जातं याच उत्तर कुठून मिळणार. बापू म्हणाले तसं होर्डींग्जची आपल्या शहराला खरच गरज नाही. महापालिकेला अंदाजे १७ कोटी रु. उत्पन्न मिळतय पण ते न मिळालेल कधीही चांगल. होर्डींग्जच्या माध्यमातून वर्षाला किती रुपयाची उलाढाल होते. महापालिकेला त्यातला दहा टक्के तरी उत्पन्न येते की नाही माहित नाही. पण शंभर, दोनशे, पाचशे या पटीमध्येच त्याच वर्णन होत असतं. होर्डींग्जच्या संदर्भात आपण निर्णय घेणं गरजेच आहे असं मला वाटत. पुन्हा एकदा बजेटच्या संदर्भातील गोष्टीच मी अभिनंदन करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे धन्यवाद मानतो आणि थांबतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे बजेट मा.स्थायी समितीचे अध्यक्ष विलासभाऊनी सादर केलं. हे बजेट खरतर एवढयासाठी मांडल गेलं. आपल्या सर्वाना कल्पना आहे की मागच्या मार्च पासून आचारसंहिता सुरु झाली आणि प्रत्येक नगरसेवकांच्या मनामध्ये भावना असते की माझ्या प्रभागातील कामे लवकर झाली पाहीजे. आज प्रशासकीय मान्यता एवढयासाठी घेतली की पुढच्या काळामध्ये बजेटच्या नंतर विधानसभेची येणारी आचारसंहिता चालू होणार आहे त्यामुळे कामाला अधिक गती मिळावी. प्रत्येकाला असं वाटत की माझ्या वॉर्डा मधल काम अगोदर सुरु झाल पाहीजे. त्याला वर्कऑर्डर मिळाली पाहीजे या सगळयाप्रतीच्या भावना असतात. खरतर आज आपण आयुक्तांच बजेट जशास तसे एवढयासाठी मंजूर केलं पण ज्या ज्या सदस्यानी याठिकाणी मत व्यक्त केलं म्हणजे मंगलाताई आता सभागृहात नाहीत, त्यांनी सांगीतल की सभागृहाचा वेळ का घेतला. कदाचित वेळ का घेतला ही त्यांना त्याची परिस्थिती माहित नसेल मागच्या सभेला करायच की पुढच्या करायच. याची जाणीव देखील आम्हांला आहे. माझ्या अगोदरच्या सहका-यांनी तळवडेच्या भागा मधील परिस्थिती सांगीतली की आम्हांला बजेट नाही. खरतर राष्ट्रवादी कॉंग्रेसने या विषयावर बोलूही नये की ज्या गावाला विकासपासून वंचित ठेवलं त्या

,

सगळयांचाच विकास आम्ही सत्तेमध्ये आल्यानंतर केला. मला एक विनंती करायची ज्या पध्दतीने उपमहापौरांनी खुप चांगल या सभागृहामध्ये भाषण केलं. शितल शिंदेनीही केलं, राहूल कलाटेही त्याच संदर्भात बोलले, वस्तुस्थिती आहे. तो पइलवान आपल्या मनामधली भावना व्यक्त करत होता, मनमोकळेपणान बोलत होता. मला महिती आहे की खुप जणांनी याबद्दल शितलच्या बद्दल असेल, राहूल कलाटेच्या बद्दल असेल अमृताच्या संदर्भामध्ये त्यांना पाठींबा देण्यासाठी काहीतरी बोलायच असेल. पण निश्चितच आपल्या सगळयांना कल्पना आहे म्हणजे शहर ज्यावेळेस आपली स्मार्ट सिटीकड वाटचाल करते, वाटचाल करत असताना शहरही बापू चांगल दिसल पाहीजे ही भावना आहे. तुम्हीच सांगीतल, कुणाल गार्डनच्या माझ्या चौकाच काय करायच आहे. आणि एखादा टपरीवाला, एखादा फ्लेक्सवाला मुजोरपणान जर वागत असेलतर मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे अशा पध्दतीच्या मुजोर ठेकेदाराला जर काम मिळालेल असेलतर त्यास ब्लॅकलीस्टमध्ये टाकण्याच काम खरतर त्यावेळेस आपण बोललो होतो. या सभागृहाच्या माध्यमातून मा.महापौर साहेब, मी तुम्हांला विनंती करतो की एक आदेश दया की अशा पध्दतीचे मुजोर ठेकेदार ते पुन्हा एकदा नाक वर करण्याचा प्रयत्न करत असतील मी तुमच्या नाकावर टिचून या महापालिकेमध्ये काम घेतोतर अशा पध्दतीच्या ठेकेदाराच काम बंद झाल पाहीजे. अशा पध्दतीचे आदेश तुम्ही मा.आयुक्तांना, प्रशासनाला दयावेत. दुसरी गोष्ट की शितलनी ज्या पध्दतीने सांगीतल मग एखादा टपरीवाला, एखादा हातगाडीवाला ज्या पध्दतीने रस्त्यावर थांबून रस्त्याच्या ट्रॅफिकला, लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न करतो आणि तो उलट गुन्हा नगरसेवकांवर दाखल करतो. शहर चांगल्या पध्दतीने दिसल पाहीजे अशी भावना आहे. सुजाताताईच्या प्रभागामधली दोन तीन महीन्यापुर्वीची घटना आहे. या सर्वसाधारण सभेमध्ये खरतर याच्यावर कितीतरी आवाज उठवला गेला. एखादया नगरसेवीका भगीनीवर तीच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची परिस्थिती, बीचारी तीन तीन आठवडे घरापासून दुर राहून अटकपुर्व जामिनासाठी प्रयत्न करते. हे शहर काही टपरीवाल्यांसाठी नाही. हे शहर काही रस्त्यावरुन, चौकाचौकामध्ये रस्त्याच्या ट्रॅफिकला अडथळे करुन आपली उपजिवीका करण्यासाठी नाही. खरतर त्याच्यासाठी आपल्याला वेगवेगळया चौकात हॉकर्स झोन करुन त्यावर मार्ग काढावा. मा.महापौर साहेब, या निमीत्तान प्रशासनाला तुम्ही आदेश दिले पाहीजेत. शितल शिंदे असतील किंवा बापू काटे असतील सगळयांच्या प्रभागामध्ये असे अतिक्रमण आहे. मा.महापौर साहेब, मी तुम्हांला या निमीत्तान प्रशासनाला आदेश देण्याची

,

विनंती करतो की चौकाचौकामधल्या सगळे अतिक्रमण, टप-या पंधरा दिवसाच्या आत काढल्या नाहीतर त्या संबंधित अधिका-यावरती कारवाई करण्याचे आदेश दयावेत आणि यापुढच्या काळामध्ये कुठल्याही नगरसेवकाला एखादा ठेकेदार असेल, एखादा फ्लॅक्सवाला असेल, एखादा टपरीवाला असेल, एखादा अनधिकृत बांधकामवाला असेल तो त्या पध्दतीने वागत असेलतर संबंधित ठेकेदाराला, त्या संबंधित टपरीवाल्याला या पुढच्या काळामध्ये शहरामध्ये कुठेही रोजगार करता येणार नाही, व्यावसाय करता येणार नाही अशा पध्दतीचे आदेश मा.महापौर आपण दयावेत. खरतर मी अभिनंदन करतो की स्थायी समितीचे सभापती विलास मिडिगेरी यांच. आपल्याला आयुक्तांनी जे बजेट दिलं त्या बजेटवर बोलण्याची सगळयाची मानसीकता, सगळयाची इच्छा आहे. मला माहिती आहे की सगळेजण खुप चांगल भाषण करु शकतात. परंतु पुढच्या काळामध्ये सभेचा अधिक वेळ न घेता मा.महापौर साहेब, जे तातडीने प्रश्न याठिकाणी नगरसेवकांनी मांडले त्याबाबत प्रशासनाला तशा पध्दतीचे आदेश दयावेत आणि सभा याठिकाणी थांबवावी अशा पध्दतीची विनंती करतो तसेच मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की आज आपले नगरसेवक कैलास बारणे यांच्या वाढदिवसा निमीत्त आणि चार विषय समित्यांचे सभापती यांची निवड झालेली आहे यानिमीत्ताने या सगळयांचा आपण सत्कार करावा आणि सभेचे कामकाज संपवाव अशाप्रकारची विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा.महापौर –** सर्व सन्मा.सभागृह. याठिकाणी अतीशय गंभीर विषय सभागृहासमोर आलेला आहे. या सभागृहातील एक सदस्य शितल उर्फ गोरख शिंदे यांच्या प्रभागामध्ये ज्या टप-या आहेत जे हॉकर्स झोन आहेत त्या संदर्भामध्ये जो विषय या सभागृहामध्ये आलेला आहे. प्रत्येक नगरसेवकांनी असे विषय भोगलेले आहेत आणि प्रत्येक नगरसेवकांना आशा समस्यांना सामोरे जाव लागलेल आहे. त्यामुळे आयुक्तांना मी या ठिकाणी आदेश देतो की संबंधित अतिक्रमण विभागाला जे अधिकारी आहेत त्या अधिका-यांना आपण आदेश दयावेत की पंधरा दिवसाच्या आत पादचा-यांना त्या हॉकर्समुळे जो त्रास होतो त्याच बरोबर फुटपाथवर जे हॉकर्स आहेत आणि वाहतूकीला अडथळा ठरणारे हॉकर्स हे पंधरा दिवसाच्या आत तातडीने काढावेत. आणि जर त्यांनी नाही काढलेतर त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्यात यावी असे आदेश मी याठिकाणी संबंधित विभागाला, आयुक्तांना देत आहे. त्याचबरोबर विषय समित्यांच्या नवनिर्वाचित सभापतीचीं निवड काल करण्यात आली त्या

,

चारही समितीचे सभापती यांचा सत्कार करण्यात येणार आहे त्याच बरोबर आज ज्यांचा वाढदिवस आहे ते कैलास उर्फ बाबा बारणे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांनाही मी याठिकाणी निमंत्रीत करतो.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.स्थायी समिती सभापती, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व गटनेते व पदाधिकारी यांचे हास्ते नवनिर्वाचित विषय समिती सभापती यांचा सत्कार करण्यात आला त्याचप्रमाणे मा.कैलास बारणे यांचा वाढदिवसामुळे सत्कार करण्यात आले.)

**मा. महापौर** – सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

-----

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/२३२/२०१९
दिनांक - ६/७/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

,